International Journal of All Research Education and Scientific Methods (IJARESM), ISSN: 2455-6211
Volume 10, Issue 3, March -2022, Impact Factor: 7.429, Available online at: www.ijaresm.com

# यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार

प्रा. बालाजी रावसाहेब बोडके

इतिहास विभागप्रमुख, सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव

*****************

## प्रस्तावना

भारताचे उपपंतप्रधान, संरक्षणमंत्री,गृहमंत्री ,अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री , अर्थ आयोगाचे अध्यक्ष, रोधी पक्षनेता, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री,कर्तव्यदक्ष प्रशासक,चतुर राजकारणी, संस्कृतीचे उपासक, साहित्याचे सहृदय रसिक , कृषी पंढरीचे वारकरी आणि आर्थिक विचारवंत.अशा विविध बहू अंगाने संपन्न व संयमी व्यक्तिमत्व महाराष्ट्राचे थोर सुपुत्र यशवंतराव चव्हाण अशा यशवंतरावांचा जन्म सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावी 12 मार्च 1914 रोजी झाला. 1914 म्हणजे पहिल्या महायुद्धाचा काळ. 1918 ला हे महायुद्ध संपले आणि प्लेगची साथ सुरू झाली.या प्लेगच्या साथीमध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यानंतर कुटुंबाची सर्व जबाबदारी विठाबाई वर पडली. त्या चार मुलांना घेऊन कराडला आल्या. रोजगार करत करत त्या मुलांचा सांभाळ करू लागल्या परंतु ही मिळकत खूप कमी होती. त्यांनी न्यायाधीशांना भेटून ज्ञानोबा ला कराडच्या कोर्टात बेलीफ म्हणून नोकरी मिळवून दिली परंतु आर्थिक अडचणीमुळे ज्या गावात यशवंतरावांचा जन्म झाला त्या देवराष्ट्रे या गावी पुन्हा यावे लागले. त्यांचे चौथीपर्यंतचे शिक्षण देवराष्ट्रे येथे झाले. पुढील शिक्षणासाठी कराडच्या टिळक हायस्कूलमध्ये दाखल करण्यात आले . 1934 ला मॅट्रिकची परीक्षा पास झाले, 1938 मध्ये त्यांनी कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयातुन बीएची पदवी संपादन केली .1941 ला पुण्याच्या लॉ कॉलेजमधून त्यांनी एलएलबी ची पदवी संपादन केली . 2 जून 1943 रोजी यशवंतराव चव्हाण व वेणूताई यांचा विवाह झाला. यशवंतरावांनी आपल्या वकिली व्यवसायाचा कराड येथे सुरुवात केली. पुढे वकिली करत करत गांधीजींच्या विचाराने प्रभावित होऊन राजकारणात सक्रिय सहभागी झाले आणि सातारा जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष झाले. त्यानंतर 1952 कराड मतदार संघातून विधानसभेवर निवडून आले . 1956 ला मुंबई राज्याच्या द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री झाले. 1960 मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली व पहिले मुख्यमंत्री म्हणून चांगली कामगिरी केली. 1963 लोकसभेवर निवडून आले. 1982 मध्ये दहाव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. पुढे असे अनेक पदे भूषवली व संकटसमयी भारत देशाच्या संरक्षणासाठी धावून गेले असे महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांचे 25 नोव्हेंबर 1984 रोजी दिल्ली येथे निधन झाले.

दीनदुबळ्यांच्या प्रश्नाविषयी कळवळा असणारे आणि आधुनिक महाराष्ट्राची पायाभरणी करणारे द्रष्टे नेते म्हणजे यशवंतराव चव्हाण होय .यशवंतराव चव्हाण हे चळवळीच्या मुशीतून तयार झालेले एक परिपक्व व्यक्तिमत्व होते .धर्मनिरपेक्ष यशवंतराव चव्हाण यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण म. गांधी ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर ,महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या आचारविचारांच्या प्रभावातून झाली होती. ह रा महाजनी, भुस्कुटे ,एस एम जोशी,आचार्य भागवत अशा दिग्गजांचा सहवास त्यांना तुरुंगात असताना लाभला होता. गांधीवाद, समाजवाद मार्क्सवाद याबरोबरच त्यांनी लेनीन चे चरित्र, रशियन राज्यक्रांतीचा इतिहास वाचला होता. सत्यशोधक समाजाचा ही त्यांच्यावर प्रभाव होता .मानवेंद्रनाथ रॉय यांच्या लिखाणाचा यशवंतरावांच्या मनावर मोठा विलक्षण परिणाम झाला होता.रॉयवादामुळे प्रभावित झालेल्या यशवंतराव चव्हाण यांनी स्वातंत्र्याचे सामाजिक आणि आर्थिक अंतरंग सोडवण्याचा प्रयत्न केला.

**यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार**

यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार प्रामुख्याने शेती, उद्योग,सहकार, समाजवाद ,आर्थिक विषमता, कामगार,औद्योगीकरण, बँकिंग इत्यादी क्षेत्राशी निगडित आहे

**१) शेती संबंधी विचार:**

स्वतः शेतकरी कुटुंबात जन्मलेले असल्यामुळे त्यांना अनेक वेळा आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागले. ग्रामीण भागातील अर्थकारण त्यांनी जवळून पाहिलेले असल्यामुळे मुख्यमंत्री असतानाच या कालावधीत त्यांनी अनेक धाडसी निर्णय घेतले.त्यामुळे यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक क्षेत्रातील योगदान महत्त्वपूर्ण ठरते.कृषिविषयक विचार मांडताना ते म्हणतात की,' हेच प्रश्न मला आणि माझ्या मित्रांना सारखे भेडसावीत आम्ही त्याची चर्चा करीत असू जमीनदार आणि साधा गरीब शेतकरी यांचं काय करायचं?हा प्रश्न होता मात्र त्याआधी स्वातंत्र्य हे आमचं पहिलं ध्येय असले पाहिजे याची आम्हाला खात्री पटली होती. तसेच शेती शेतीच्या मालकी हक्काचा प्रश्न, भूमिहीनांचा प्रश्न व कृषी विकासासाठी उपाय यावर भर दिला. त्यांच्या मते जमीन कसणारा जमिनीचा मालक असला पाहिजे. भारतात शेतीक्षेत्रात भूमिहीन यांची संख्या अधिक आहे म्हणून ज्यांच्याकडे अधिक जमीन आहे त्यांनी एक ते दोन टक्के जमीन भूमिहीनांना द्यावी. त्याच बरोबर पडीक जमीन लागवडीखाली आणली जावी. शेतीच्या आधुनिकिकरणाच्या मार्गातील अडथळे दूर केले जावेत. नद्यांच्या पाण्याचा शेतीसाठी वापर केला जावा. नद्यांवर धरणे बांधली जावेत .जेणे करुन शेती उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ होईल.यशवंतरावांनी सामाजिक समता व सामाजिक न्यायाच्या य शेतीचा विचार केला. भारतात शेती क्षेत्रात भूमिहीन यांची संख्या अधिक आहे म्हणून वाजवीपेक्षा अधिक जमिनी असणाऱ्या लोकांच्या जमिनीचा एक ते दोन टक्के जमीन त्यांना द्यावी तसेच जमीन अविकसित असल्याने ती अनुत्पादक व पडीक राहिली आहे. अशा जमिनी लागवडीखाली आणणे आवश्यक आहे. शेती व्यापारी तत्त्वांनी केली पाहिजे.

शेतीच्या आधुनिकीकरणाच्या मार्गातील अडथळे दूर केले पाहिजेत. नद्यांच्या पाण्याचा शेतीसाठी वापर केला पाहिजे यावर धरणे बांधली पाहिजे. धरण पाण्याने विस्थापित होणाऱ्या लोकांचे पुनर्वसन केले पाहिजे. शेतकऱ्यांनी कृषी शास्त्राचा अभ्यास केला पाहिजे असे मत त्यांनी मांडले. आपल्या देशातील शेती करण्याबाबत शेतकरी खुप मागे आहेत. त्यामुळे शेतीचा म्हणावा तेवढा विकास झाला नाही. याचे कारण शेतीला अपुरा कर्ज पुरवठा, पाणी पुरवठा यांच्या सोयीचा अभाव. आधुनिक खते व बियाणांचा अभाव या सर्व गोष्टींचा अभाव यामुळे शेतीचा विकास होऊ शकला नाही. त्यांच्यामते शेतीच्या क्षेत्रात प्रगती साध्य करायची तर या प्रश्नाच्या मानवी आणि आर्थिक अशा दोन्ही बाजू कल्पकतेने सोडवाव्या लागतील. हे ओळखून यशवंतरावांनी पावली टाकली. आज शेतीचा संबंध नव्या शोधांची शेती करण्याच्या नव्या नव्या पद्धतीशी लावायचा असेल तर हे नवे शास्त्र शेतकरीवर्गाला आपण शिकवले पाहिजे. या कामांमध्ये आम्हाला शिक्षणाचा उपयोग करून घेता येईल. या दृष्टीने तांत्रिक शिक्षणाचे महत्त्व त्यांनी पटवून दिले .देशातील लोक अडाणी व अशिक्षित असल्यामुळे शेती व शेती शिक्षण यांचा एकत्रित विचार करू शकत नाही. म्हणून शेती संबंधित असणारा शेतकरी जोपर्यंत शहाणा होत नाही तोपर्यंत शेतीचा विकास होणार नाही .शेतकऱ्यांना शेती संबंधी आधुनिक ज्ञान देऊन त्यांचे अज्ञान दूर केल्यास शेती उत्पादनात वाढ होईल.ग्रामीण समाजाचा आर्थिक चेहरामोहरा बदलण्याच्या ध्येयाची बांधिलकी त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळापासून कार्यकर्ता या नात्याने ग्रामीण क्षेत्रात कार्य करीत असलेल्या काळापासून मनाने स्वीकारली होती. शेतकरी हाच महाराष्ट्राचा प्राण असून शेतकरी हेच महाराष्ट्राचे राज्यकर्ते असे असे जाहीरपणे सांगणारे यशवंतराव हे पहिले मुख्यमंत्री होते. शेतजमिनीचा कमाल धारणेवर मर्यादा घालण्याचा कायदा करून यशवंतरावांनी महाराष्ट्र हा खऱ्या अर्थाने पुरोगामी असल्याचे देशात सर्वप्रथम प्रत्ययास आणून दिले.1961 जानेवारीमध्ये महाराष्ट्रातल्या शेत जमिनीबाबतचे विधेयक समोर आले. या विधेयकामुळे दूरगामी अशा जमीन सुधारणेचा पाया घातला गेला. केंद्र सरकारने सिलिंगचा कायदा करण्याचा विचार त्यानंतर दहा बारा वर्षांनी केला.यातच यशवंतरावाच्या

ग्रामीण आणि शेती विकास विषयक दृष्टिकोन याचा प्रत्यय येतो. भारतात शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या लहान मोठ्या धरणाची संख्या फार कमी आहे.नद्यांच्या पाण्याचा वापर शेतीसाठी केला जात नाही .नद्यांचे पाणी वापराविना वाया जाते.त्यासाठी लहान -मोठ्या नद्यावर लहान-मोठी धरणे बांधली पाहिजेत.धरणामुळे जे लोक विस्थापित होतील त्यांच्या पुनर्वसनाची सोय केली पाहिजे. लहान मोठ्या धरणामुळे शेती उत्पादनात वाढ होण्यास मदत होईल. यशवंतराव चव्हाण यांच्या मते समतोल विकास करताना अविकसित विभागांचा आधी विचार केला जावा.

ग्रामीण भागात उद्योग सुरू करून शेती व उद्योग यांची सांगड घातली जावी त्यामुळे श्रमिकांचा शहराकडे जाणारा लोंढा कमी करता येईल. त्यासाठी त्यांनी विकासाच्या मास्टर प्लॅनची कल्पना मांडली. त्यांच्या मते देशाच्या विकासासाठी भारतासारख्या कृषिप्रधान देशात विकासासाठी सहकारी तत्वे फार उपयुक्त ठरतात .शेतकरी साखर कारखान्याची स्थापना करून समतोल विकास करण्याचा प्रयत्न यशवंतरावांनी केला. शेतीच्या आर्थिक विकासासाठी ग्रामीण भागात शेतीवर आधारित उद्योगांची स्थापना करून शेती व उद्योग यांची सांगड घातल्यास आर्थिक विकासाला चालना मिळेल. औद्योगिकरणामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य बाजारपेठ मिळेल. उद्योगांना लागणारा कच्चामाल ग्रामीण भागातच उपलब्ध होईल. वाहतुकीचा खर्च वाचेल, ग्रामीण भागात रोजगार वाढेल असे यशवंतराव चव्हाण यांना वाटत होते. त्यासाठी देशाचा औद्योगिक विकास करण्यासाठी उद्योगात आधुनिक तंत्राचा वापर केला जावा. नवीन तंत्रज्ञानामुळे कौशल्यात वाढ होते परिणामी उत्पादनात वाढ होऊन देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळते असे मत मांडले .औद्योगिक विकासासाठी आर्थिक नियोजन महत्त्वाचे असते लोखंड पोलाद वीज वाहतूक यासारख्या क्षेत्रात विकास नियोजनामुळे करता येतो व यातूनच विकासाला चालना मिळते. त्यासाठी मूलभूत व अवजड उद्योग यांच्या उभारणीवर भर देणे आवश्यक आहे असे म्हटले.

शेतकऱ्यांना शेतीसाठी योग्य दराने पत पुरवठा व्हावा यासाठी सहकारी बँका व पतसंस्था स्थापन कराव्यमत. ग्राहकांना योग्य किमतीत वस्तू उपलब्ध होण्यासाठी ग्राहक सहकारी संस्था स्थापन कराव्यात. जेणेकरून सहकारी चळवळीचा विकास होऊ शकेल. त्याचबरोबर शेतीवर आधारित उद्योगांची स्थापना सहकार क्षेत्रात करून करून शेतीचा विकास करावा. असा दृष्टिकोन यशवंतराव चव्हाणांचा होता. शेतकऱ्यांनी पिकविलेल्या शेतमालाला योग्य भाव मिळण्यासाठी सहकारी खरेदी-विक्री संस्था स्थापन कराव्यात व या संस्थांमार्फत पिकवलेला शेतमाल विकला जावा .जेणेकरून शेतकऱ्यांनी पिकवलेल्या मालाला योग्य किंमत मिळेल व देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल असे मत मांडले .भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी सहकारी तत्त्वाचे पालन महत्त्वाचे असते कारण सहकारी तत्वात आर्थिक विकास करण्याची शक्ती आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या मते सहकारी शेतीमुळे शेतीमधील उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढते त्यासाठी सहकारी शेती संस्था स्थापन करावी. अशा सहकारी संस्था मुळे शेतकऱ्यांना शेती संबंधित ज्ञानाची देवाण-घेवाण करता येते परिणामी शेती उत्पादनात वाढ होते असे मत यशवंतराव चव्हाण यांनी मांडले.

त्याचबरोबर शेतीला शेतीपूरक व्यवसाय असावा. ग्रामीण भागाचा सामाजिक आर्थिक विकास करण्यासाठी शेतीवर आधारित उद्योग स्थापन करण्यात यावेत .अशा उद्योगांमधून उपभोग्य वस्तू व सेवा यांची निर्मिती केली जावी असे ते म्हणतात. ग्रामीण भागात उद्योग सुरू करून शेती आणि उद्योग यांची सांगड घातली जावी. औद्योगिक विकासासाठी नियोजन महत्त्वपूर्ण आहे. देशाचा संतुलित आर्थिक विकास व्हावा यासाठी संयुक्त औद्योगिक क्षेत्राची कल्पना मांडली. तात्कालीन कालखंडात मुंबई राज्यात औद्योगिक वसाहती स्थापन करण्यासंदर्भात योजनेत त्यांनी पुढाकार घेतला. राज्याचे औद्योगीकरण करण्यासाठी एक सर्वकष योजना मांडली. या योजनेच्या माध्यमातून उत्पादनाची समन्वित प्रगती घडून आणि त्यापासून उपलब्ध होणाऱ्या फायद्याची मालक, कामगार व ग्राहक यांच्यात समान वाटणी करणे हे या योजनेचे उद्दिष्ट असल्याचे यशवंतरावांनी या सूत्रात नमूद केले . त्यांच्या मते या देशांची अर्थव्यवस्था अगतिक किंवा मागासलेली आहे

.तेथे जलद विकास करून आणावे नसल्यास निदान सुरुवातीला तरी निरनिराळ्या उद्योगधंद्यांची समतोल अशी वाढ करण्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे . महाराष्ट्र व्यापारी व औद्योगिक परिषदेत सहभागी झाल्यानंतर त्यांनी आपले विचार व्यक्त केले की,उद्योगधंद्यात सरळ प्रवेश करण्याच्या उपक्रमात आणि विशेषता शेतमालावर प्रक्रियाकरण्याच्या उद्योगात सहकारी संघटनेला फार महत्त्व आहे .उद्योगधंद्याची सहकारी तत्त्वावर कशी परिणामकारक संघटना होऊ शकते हे या राज्याने दाखवून दिले आहे.

महाराष्ट्रात जमीन धारणेचा प्रभाव कमी असून लहान शेतकऱ्यांच्या संख्या जास्त आहे. बागायती शेतीच्या तुलनेत कोरडवाहू शेतीचे क्षेत्र फार मोठे अशा स्थितीत शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी कृषी औद्योगिक समाज रचनेची कल्पना त्यांनी मांडली. शेतीला जोड व्यवसाय हा पूरक उद्योग जोडणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले. त्यांनी मंत्रिमंडळ सहकाऱ्यांना पटवून दिले कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना सूतगिरणी, भुईमुगाच्या उत्पादकांना सहकारी तेल गिरण्या, उसाच्या क्षेत्रात साखर कारखाने यामधून उद्योग व्यवसाय आणि सहकार क्षेत्राचा समन्वय साधला.राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टिकोनातून कृषी,मत्स्य व्यवसाय, उद्योग ,वन आणि सहकाराशी निगडित कार्यक्रम राबविणे व त्यावर भर दिला पाहिजे. हैराण झालेल्या खेड्यातील सामान्य माणसाला आर्थिक समस्या सोडविण्यासाठी त्यांनी सहकारी साखर कारखाने, सहकारी बँका ,सहकारी सोसायट्या, खरेदी विक्री केंद्राची स्थापना केली .तसेच सहकारी सिंचन योजना साठी प्रयत्न केले. सहकारी चळवळीमुळे सहकारी चळवळीचे जाळे महाराष्ट्रभर निर्माण करत कृषीला औद्योगिकतेची जोड दिली.

यशवंतरावांच्या सहकारी तत्त्वांच्या पुढाकारामुळे ऑगस्ट 1997 मध्ये महाराष्ट्राने 18 सहकारी साखर कारखाना याची नोंद करून अग्रेसरत्त्व प्रस्थापित केले. याशिवाय नव्या साखर कारखान्यांची आर्थिक भांडवलाची अडचण दूर करून सरकारने त्यांच्या भागभांडवल 28 लाख रुपये गुंतविण्याचा निर्णय घेऊन प्रत्यक्षात ते भांडवल गुंतवून कामाला चालना दिली सहकारी शेतीचा हे त्यांनी पुरस्कार केला.

समाज ही अर्थशास्त्रीय संकल्पना आहे जेव्हा देशातील संपत्ती आणि संशोधनावर प्रामुख्याने समाजाची मालकी असते तेव्हा त्यास समाजवाद असे म्हणतात. समाजवादात समाजवादाच्या सैद्धांतिक अधिष्ठान यात समाजाची मालकी ,आर्थिक नियोजन ,राज्याचे महत्त्व ,आर्थिक विषमता कमी करणे ,समाजरचना सामाजिक कल्याण, मूलभूत बाबींची आर्थिक नियंत्रण सामाजिक निगडीत वस्तूंचे उत्पादन इत्यादी बाबींना महत्त्व दिले जाते .महाराष्ट्रात सर्वप्रथम समाजवाद आणण्याची घोषणा यशवंतरावांनी 1962 साली केली .यशवंतराव शास्त्रशुद्ध समाजवादाचे पुरस्कर्ते होते. समाजवाद या बाबतचे आपले विचार मांडताना यशवंतराव मत व्यक्त करतात की,व्यक्तींच्या आर्थिक परिस्थितीमध्ये आज मोठी दरी आहे. ती जास्तीत जास्त कमी करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे समाजातील सर्व वर्गांना एक प्रकारची सारखी आणि समान संधी मिळेल. अशा प्रकारची संधी निर्माण झाली . कुठलाही एक व्यक्ती किंवा व्यक्तींचा समूह अथवा गट अगर वर्ग दुसऱ्याची पिळवणूक करीत नाही असा समाजाचे चित्र मी पाहतो.

कामगार उत्पादनातील महत्त्वाचा घटक आहे त्याला उद्योगाच्या व्यवस्थापनात सहभागी करून घेतल्यास औद्योगिक कलह निर्माण होणार नाही. त्यांची उत्पादन क्षमता वाढून मालक व कामगार यांच्यात सलोख्याचे संबंध निर्माण होतील.याशिवाय उत्पादनात वाढ होण्यासाठी कामगारांना प्रशिक्षण अशा योजना राबविण्यात याव्यात असे त्यांनी सुचवले. भारतातील परिस्थिती लक्षात घेऊन इतर राष्ट्रांनी कशा प्रकारे प्रगती केली आहे हे लक्षात घेऊन समाजवादाचा स्वीकार करण्यात यावा. सार्वजनिक क्षेत्र विकसित करून लोकांच्या कल्याणावर अधिक भर देण्यात यावा.जेणेकरून समाजातील विषमता कमी होईल कारण समाजातील सर्व लोकांना समान संधी उपलब्ध करुन देणे हा समाजवादाचा मुख्य उद्देश असतो. थोडक्यात लोकांचे शोषण न करता मूलभूत समस्या सोडवणे म्हणजे समाजवाद होय. विषमता कमी करणे, पिळवणूक बंद करणे म्हणजेच समाजवाद होय.असाच समाजवाद यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रात स्वीकारला.

यशवंतराव चव्हाण गृहमंत्री असताना कॉंग्रेसने समाजवादाच्या प्रस्थापनेसाठी दिल्ली कॉंग्रेसच्या अधिवेशनात दहा कलमी कार्यक्रम मांडला .त्यात देशातील बँका व सामाजिक नियंत्रण, संस्थानिकांचे तनखे बंद करणे, देशातील त्वरित भूसुधारणा, शहरी मालमत्ता, कमाल जमीन धारणा,प्राथमिक शिक्षणाची पूर्तता, विकेंद्रीकरण मक्तेदारी विरुद्ध उपायोजना,आयात-निर्यात व्यापार,विमा ,राष्ट्रीयीकरण,अर्थ सत्तेचे विकेंद्रीकरण इत्यादी दहा कलमी कार्यक्रम तयार करण्यामध्ये गृहमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे योगदान महत्त्वाचे होते. देशाचे अर्थमंत्री असताना 1971 ते 1976 या काळात त्यांनी भारत देशाला पाच अर्थसंकल्प दिले. त्यांच्या अंगी देशाच्या आर्थिक विकासाचा विषयी तळमळ होती .त्यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पातून त्यांची अर्थतज्ञ म्हणून प्रतिमा सर्वांच्या मनावर कोरली गेली. त्यांनी पंचवार्षिक योजना प्रभावीपणे राबविण्याचा प्रयत्न केला. यशवंतराव यांच्या कारकिर्दीत 1971 ते 1978 हे आर्थिक दृष्ट्या महागाईचे वर्ष होते .भारतीय जनता महागाईच्या वनव्यामध्ये भरडली जात होती. देशात दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली . देशात अन्नधान्य समस्या निर्माण झाली आणि धान्य आयातीच्या समस्यांमुळे देशातील आंतरराष्ट्रीय व्यापार प्रतिकूल झालेला होता. देशात बेरोजगारीच्या प्रमाणात वाढ झाली होती. अशाही परिस्थितीत यशवंतरावांनी मार्ग काढण्याचा त्यांनी कसोशीने प्रयत्न केला.

यशवंतराव चव्हाण अर्थमंत्री म्हणून घेतलेले निर्णय महत्त्वपूर्ण आहेत त्यांनी देशातील महागाई नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न केले आर्थिक क्षेत्रातील मक्तेदारी चा अभ्यास आणि उपाययोजना या संदर्भात आयोगाची नियुक्ती केली. आर्थिक क्षेत्राच्या संदर्भात अनेक महत्त्वाचे कायदे मंजूर केले. देशातील काळा पैसा साठविण्याच्या प्रवृत्तीला आळा घालण्याचा प्रयत्न केला .देशातील करदात्याचे प्रमाण वाढून कर चुकवून नियंत्रण प्रस्थापित केले. गरिबी हटाव योजनेशी पूरक निर्णय आणि आर्थिक तरतूद उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. यशवंतरावांच्या आग्रहामुळे प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण आणि संस्थानिकांचे तनखे रद्द झाल्याने आर्थिक धोरणाचे दिशादर्शन झाले. यशवंतरावांनी 24 मार्च 1971 रोजी लोकसभेत सादर केलेला अर्थसंकल्प हा नव्या दिषेचा निदर्शक होता .शहरी भागातील मालमत्तेच्या धारणेवर कमाल मर्यादा घालण्याचे धोरण त्यांनी राबविले शेतमालाच्या व्यापारातील मध्यस्थांना आणि त्यांच्या नफे बाजीला मुळीच वाव राहणार नाही अशा रीतीने शेतमालाची खरेदी सुरू व्हाव्यात अशा पद्धतीने त्याने धोरणे आखण्यावर भर दिला. साठेबाजी करून कृत्रिम टंचाई निर्माण करण्याचा व लोकांकडून भरमसाठ भाव वसूल करण्याचा कट ही त्यांनी उधळून लावला .

यशवंतराव चव्हाण ही महाराष्ट्राच्याच नव्हे तर संपूर्ण भारताच्या राजकारणातील,समाजकारणातील ,अर्थकारणातील प्रगल्भ जाणिवेचे नेतृत्व होते.हे वरील त्यांच्या विचारातून आणि कार्यातून सिद्ध होते.यशवंतराव चव्हाण हे स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेऊन त्यांनी राज्याचा सर्वांगीण विकासाचा पाया रचला.शिक्षण, शेती, पंचायत राज,औद्योगिक,सामाजिक, साहित्य व प्रशासन अशा सर्वच क्षेत्रातील विकास कामाचा अंकुर त्यांच्या कारकिर्दीत निर्माण झाला आणि त्यांचे रूपांतर मोठ्या वृक्षात होऊन आज आपण उभा महाराष्ट्र सावलीच्या रूपाने अनुभवत आहे. ते सर्जनशील विचाराने झपाटलेले कर्तव्यदक्ष अभ्यासू नेते होते .महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांचे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. त्यांनी समाजाला आपल्या कर्तृत्वातून एक आदर्श निर्माण करून दिला. त्यांचे महाराष्ट्र राज्याच्या जडणघडणीतील योगदान अनन्यसाधारण व मोठे आहे.म्हणून यशवंतराव चव्हाणांना महाराष्ट्राचे शिल्पकार असे म्हटले जाते.

## संदर्भ :-

[1]. प्रधान राम, यशवंतराव चव्हाण, जीवनप्रवाह,इंडस सोर्स बुक्स प्रकाशन, प्रथमावृती, जानेवारी २०१३.
[2]. टिकेकर अरुण व इतर (संपा.) महाराष्ट्रभूषण यशवंतराव चव्हाण,गंधर्ववेध प्रकाशन,नोव्हेंबर२०१०.
[3]. चव्हाण यशवंतराव, सह्याद्रीचे वारे, रोहन प्रकाशन, नवीन जन आवृती, जून २०१४.

[4]. चव्हाण यशवंतराव, भूमिका, रोहन प्रकाशन, नवीन विशेष जन आवृती, जानेवारी ३०.
[5]. पाटील कायंदे, यशवंतराव चव्हाण, चैतन्य पब्लिकेशन्स, प्रथमावृती, डिसेंबर २०००.
[6]. चव्हाण यशवंतराव, सह्याद्रीचे वारे, पूर्वोक्त. कित्ता. चव्हाण यशवंतराव, कृष्णाकाठ, रोहन प्रकाशन, नवीन विशेष जन आवृती, एप्रिल २०१२.
[7]. पवार एन. डी., यशवंतराव चव्हाण: व्यक्ती आणि वाङ्.मय, स्नेहवर्धन प्रकाशन, प्रथमावृत्ती, २०१२.
[8]. इंगळे बी.डी., आर्थिक विचाराचा इतिहास, अरुणा प्रकाशन, लातुर. उढाण यु. ए.,महाराष्ट्र टाईम्स , मार्च २०१४.
[9]. महनोर ना.धो., यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई. यशवंतराव चव्हाण विकास मंच, जुलै २०१७.




Editor
Dr.Bapu G. Gholap

53) सबाल्टर्न इतिहास लेखन
**प्रा. डॉ. केशव अंबादास लहाने, जि. औरंगाबाद** ||208

54) शासकीय दहशतवाद भारतीय लोकशाही पुढील एक आव्हान...!
**डॉ.शिंदे आर.डी., जि. नांदेड** ||211

55) भारतीय लोकशाही – आव्हाणे आणि उपाय
**प्रा.डॉ.राजेंद्र ज्ञानोबाराव शिंदे, जि.नांदेड** ||217

56) अस्पृश्यांच्या धर्मांतराची कारणमिमांसा
**प्रा. सुदर्शन उद्धवराव स्वामी, जि. बीड** ||220

57) भारतीय आरमाराचे जनक– छ. शिवाजी महाराज
**प्रा. बालाजी रावसाहेब बोडके, माजलगाव** ||223

58) आधुनिक काळातील नोकरशाहीची भूमिका
**डॉ. ज्ञानेश्वर साहेबराव शिंदे, जि.बीड** ||226

59) A Study of Agricultural Development: New Trends and Issues in Maharashtra State
**Mr. Ughade Ashok Sandipanrao, Nanded** ||229

60) मानवी हक्क व महिला संबंधित विविध कायदे
**उषा देवराव किरवले** ||234

61) भारतातील सामाजिक व राजकिय समस्या: आव्हाणे व उपाय शेतकरी आंदोलन
**सुलभा बब्रुवान सोळंके, औरंगाबाद** ||236

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

ब्रिटिशांनी हे सिद्ध करून दाखवले. याचाच बोध आजही भारतीय नौदल घेत असतो म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांना भारतीय आरमाराचे जनक असे संबोधले जाते.

**संदर्भ ग्रंथसूची :—**

१) सेन एस एन ,मराठ्यांची लष्करी व्यवस्था,

२) कटारे अनिल, मध्ययुगिन भारताचा इतिहास.

३) बिरादार टि.के., मराठ्यांचा इतिहास ,

४) कोकाटे श्रीमंत, विश्ववंदे छत्रपती शिवाजी महाराज.

५) दवे अनिल महादेव, छ. शिवाजी आणि स्वराज्य.

६) आपटे भा. कृ. शिवाजी महाराजांचे आरमार.

७) सरूडकर प्रशांत, शिवरायांचे आरमार.

८) अमात्य रामचंद्र,सभासद बखर व राज्य व्यवहार कोश, आज्ञापत्रे.

९) जाधव रमेश, दुर्ग जिज्ञासा

❑❑❑

**58**

# आधुनिक काळातील नोकरशाहीची भूमिका

**डॉ. ज्ञानेश्वर साहेबराव शिंदे**
लोकप्रशासन विभाग प्रमुख
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव जि.बीड

**********

**प्रस्तावना :**

संघटना विशेषत: शासकीय संघटना आणि त्यामध्ये कार्यरत असणारी शासकीय यंत्रणा म्हणजे नोकरशाही हि लोकप्रशासनाचा केंद्रबिंदू आहे. नोकरशाही हि शासनाचे एक अविभाज्य अंग आहे. कारण नोकरशाहीच्या माध्यमातूनच शासन आपल्या ध्येयधोरणांची व नवीन निर्णयाची अंमलबजावणी करत असते. आज प्रत्येक ठिकाणी मग ते सार्वजनिक क्षेत्र असो कि, खाजगी क्षेत्र असो किंवा विकसित,अविकसित देशातील प्रशासन असो हे सर्व क्षेत्र नोकरशाहीने व्यापलेले आहे. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिगत, सामाजिक, राजकीय आर्थिक,संघटनात्मक जीवनावर नोकरशाहीचा प्रभाव पडत असतो.

**संशोधन लेखाचे उद्देश:**

१. आधुनिक नोकरशाहीचा अभ्यास करणे.

२. नोकरशाहीची आधुनिक काळातील सामाजकल्यानाची भूमिका अभ्यासाने.

३. शासकीय ध्येयधोरणातील अंमलबजावणीतील भूमिका अभ्यासाने.

**नोकरशाहीचा अर्थ व स्वरूप:**

नोकरशाही हि एक व्यापक संकल्पना आहे. नोकरशाही वाईट आहे कि चांगली हे जरी कोणीच निश्चीत सांगू शकत नसले तरी शासनाच्या वर्तमान संरचनेत ती एक महत्वपूर्ण आहे. नोकरशाही हि व्यावसाईक प्रशासनाची अशी पसरलेली व्यवस्था आहे कि,ज्यामध्ये नवनियुक्त पदाधिकारी पद्सोपान रचनेचा भाग आहे ज्याच्यावर पूर्ण समाजाची परिपूर्ती अवलंबून

असते. फ्रेंच भाषेतील 'ब्युरो' (Bureau) या शब्दापासून इंग्रजीतील 'ब्युरोक्रसी' (Bureaucracy) अर्थकारीतंत्र / नोकरशाही हा शब्द तयार झालेला आहे. ब्युरोचा शब्दश: अर्थ 'लिहिण्याचा टेबल' असा होतो म्हणजे डेस्क किंवा टेबलवरील सरकार असेही याला म्हणता येते. हुकूमशाहीमध्ये ज्याप्रमाने हुकूमशहा केंद्रबिंदू असतो, लोकशाहीमध्ये लोक असतात तसे नोकरशाहीमध्ये हे शासकीय नोकर किंवा अधीकारी महत्वाचे असतात. यामुळे अधिकार्यामार्फत व अधीकार्यासाठी चालाविले जाणारे शासन म्हणजे नोकरशाही शासन असा एक अर्थ लावता येतो. फ्रेंच वीचारवत वीन्सेंट डी. यांनी या शब्दाचा वापर सर्व प्रथम १७४५ साली फ्रांसमधील तत्कालीन अनागोंदी, अव्यवस्था अनुभवतांना एक आजार म्हणून नकारात्मक अर्थाने केला होता. शासकीय अधिकार्यांचा स्वैराचार, अपव्यय, हस्तक्षेप, अकार्यक्षमता, सत्तेचा दुरुपयोग, उदासीनता, अहंभाव या काहीशा अवमानजनक,सदोष अर्थाहिन नोकरशाही शब्दाचा वापर अधिक झाला. अन्यथा नोकरशाहीतील अधिकारी व्यक्तीला अनुभवी, ज्ञानी किंवा जबाबदार या अ अर्थानेही पाहिले जाते. नोकरशाही हा एक अस्पष्ट शब्द आहे. थोडक्यात, नोकरशाही हा शब्द बहुआयामी व अनेकार्थी आहे. आधुनीक शासनात नोकरशाही अपरीहार्य असते. हे एक असे प्रशासकीय संघटन अथवा लोकसेवकांचे सरकार आहे ज्याचा उद्देश स्वहित साध्य करणे नसून जनतेला सेवा देणे हा असतो. वरील विश्लेषनातून असे म्हणता येते की नोकरशाहीमध्ये पदसोपान, सत्तेची कायदेशीरता, निश्चीत कार्यपद्धती असते. याशिवाय व्यवस्थेमध्ये अनेक दोष आहेत.

**आधुनिक काळातील नोकरशाहीची भूमिका:**

नोकरशाहीचे अनेक प्रकार आहेत जे नोकरशाहीचे स्वरुप व भूममका स्पष्ट करतात. नोकरशाहीची हि भूमिका खालील मुद्यांच्या आधारे स्पष्ट होते. नोकरशाही ही अपरिहार्य आणि शासनसंस्थेचा अवीभाज्य घटक असल्याने त्याचे महत्वही मोठे आहे. शासनप्रकार कोणताही असला तरी नोकरशाहीची ठराविक कार्य ही कायमच राहहलेली आहेत.

**ध्येयधोरणाची शिफारस करणे:**

नोकरशाहीची भूमिका सर्व काळात महत्वाची राहिलेली आहे. ध्येयधोरणाची निर्मिती, कायदे निर्मिती, हे कार्यकारी मंडळ व कायदेमंडळाचे कार्य असले तरी या तांत्रिक व गुंतागुंतीच्या कार्याची पूर्तता नोकरशाहीच्या मदती शिवाय होवू शकत नाही. कायदेमंडळातील सदस्य हे अननुभवी व विषय ज्ञान नसणारे असू शकतात, अशावेळी नोकरशाहीचाच सल्ला उपयुक्त ठरतो. कोणत्या समस्येवर काय उपाययोजना होवू शकते? सार्वजनिक धोरनाचे स्वरूप कसे असावे ? या व अशा सर्व बाबींची शिफारस ही नोकरशाहीच करत असते.

**कायद्याचा मसूदा सुचविणे,अंमलबजावणी करणे:**

नोकरशाही स्थायी, अनुभवी, तंत्रकुशल असल्याने कायदेनिर्मितीसाठी नोकरशाही कायदेमंडळाला सूचना व माहितीचा पुरवठा करत असते. कायदेनिर्मितीसारख्या किचकट व गुंतागुंतीच्या प्रक्रिया या नोकरशाहीच्याच टेबलावर पूर्ण होतात. कायद्याचा मसुदा ध्येयधोरणाचा मसुदा, आराखडा तयार करून कायदेमंडळाला तो सुपूर्द करण्याचे कार्य नोकरशाही करते. कायदेमंडळात ध्येयधोरणाला मान्यता मीळाल्यानंतर त्यांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्याचे कार्य ही संख्येने अत्यंत मोठया असणाऱ्या नोकरशाहीलाच करावे लागते. कायदेनिर्मीतीची प्रक्रिया निर्दोष पार पडल्यानंतर तीतकीच महत्वाची प्रक्रिया त्यांच्या सुव्यवजस्थत अंमलबजावणीची असते.यामध्ये नोकरशाही महत्वाची भूमिका पार पाडते.

**सामाजिक परिवर्तन व न्याय:**

नोकरशाहीची ओळख तिच्या तांत्रिक व कायदेशीरपानामुळे होत असते. मात्र आजघडीला नोकरशाहीची ही रुक्ष ओळख पुसण्याचे प्रयत्न होत आहेत. सामाजीक न्याय व परिवर्तनसाठी नोकरशाहीने प्रतिबद्ध असावे आणि त्यासाठी त्यांनी आपले कौशल्य अनुभव पानाला लावावा अशी अपेक्षा आज त्यांच्याकडून केली जाते. वैविध्यपूर्ण समाजातील वेगवेगळ्या मागण्या व अपेक्षांची पूर्तता करीत असतांना नोकरशाहीचीच भूमिका सर्वाधिक महत्वपूर्ण ठरते. शासन आणि जनता यांच्यामध्ये विश्वासू मध्यस्थाची भूमिका आज नोकरशाहीला पार पाडावी लागत आहे.

दुर्बल,वंचित घटकांना लाभ मिळवून देणे, गरजू, गरीबांपर्यंत शासकीय मदत पोचविने आजच्या नोकरशाहीची प्रमुख काये आहेत. कल्याणकारी राज्यात तर नोकरशाहीची हीच भूसमका सर्वाधिक महत्वपूर्ण आहे.

**आर्थिक विकास:**

आज संपूर्ण देशाच्या आर्थिक विकासाला गती देण्याचे मुख्य कार्य नोकरशाहीला करावे लागते. अर्थसंकल्पाची निर्मिती असो, आर्थिक विकासाच्या योजना असो,दारिद्र्य निर्मुलन रोजगार निर्मितीच्या योजना यामध्ये नोकरशाहीची भूमिका महत्वाची ठरते. औधोगीकरण होत असलेल्या देशात मुख्य नियामक म्हणून नोकरशाहीलाच पुढाकार घ्यावा लागतो. याशिवाय या देशामध्ये परकीय गंगाजळी आनण्यासाठी आपल्या कार्यात लवचीकता आणणे देखील नोकरशाहीच्या आजच्या प्राधान्यक्रमात आहे.

**लोकशाहीचे संवर्धन:**

जनतेप्रती अनुत्तारदायीत्व, शक्तीप्रियता, स्वहित केंद्रीतता यामुळे आधनुनक लोकशाही विचारकांनी लोकशाही शासनव्यवस्था व नोकरशाही परस्परांना पुरक व उपयुक्त असल्याचे सप्रमाण सिद्ध केले व्यवस्थेच्या विरोधात नोकरशाही असल्याचा विचार मांडण्यात येत असे. मात्र आजघडीला कायदेमंडळांना तथ्य—माहिती, आकडेवारीचा पुरवठा करण्याचे कार्य नोकरशाही करते.

**सारांश:**

नोकरशाही ही सार्वत्रिक व अपरिहार्य स्वरुपाची यंत्रणा असली तरी तिच्या संबंधाने असणाऱ्या अनुभव व मतांमध्ये एकवाक्यता नाही. प्राचीन काळापासून तिचे अस्तित्व आहे. नोकरशाहीची भूमिका सर्व काळात महत्वाची राहिलेली आहे. ध्येयधोरणाची निर्मिती, कायदे निर्मिती, हे कार्यकारी मंडळ व कायदेमंडळाचे कार्य असले तरी या तांत्रिक व गुंतागुंतीच्या कार्याची पूर्तता नोकरशाहीच्या मदती शिवाय होवू शकत नाही. नोकरशाही स्थायी, अनुभवी, तंत्रकुशल असल्याने कायदेनिर्मितीसाठी नोकरशाही कायदेमंडळाला सूचना व माहितीचा पुरवठा करत असते. कायदेनिर्मितीसारख्या किचकट व गुंतागुंतीच्या प्रक्रिया या नोकरशाहीच्याच टेबलावर पूर्ण होतात. कायद्याचा मसुदा ध्येयधोरणाचा मसुदा, आराखडा तयार करून कायदेमंडळाला तो सुपूर्द करण्याचे कार्य नोकरशाही करते. नोकरशाहीची ओळख तिच्या तांत्रिक व कायदेशीरपानामुळे होत असते. मात्र आजघडीला नोकरशाहीची ही रुक्ष ओळख पुसण्याचे प्रयत्न होत आहेत. जनतेप्रती अनुत्तारदायीत्व, शक्तीप्रियता, स्वहित केंद्रीतता यामुळे आधनुनक लोकशाही विचारकांनी लोकशाही शासनव्यवस्था व नोकरशाही परस्परांना पुरक व उपयुक्त असल्याचे सप्रमाण सिद्ध केले आहे.

**संदर्भसूची:**

१. एम.पी.शर्मा आणि बी.एल.सडाना लोकप्रशासन तत्वे आणि व्यवहार,किताब महल नवी दिल्ली.

२. डॉ.बी.एल.फाडिया,उच्चतर लोकप्रशासन,आगरा प्रकाशन,आगरा—२००४

३. सुरेंद्र कटारिया, लोकप्रशासन सिद्धांत एव व्यवहार,जयपूर प्रकाशन जयपूर—२००५

४. भारत सरकार, द्वितीय प्रशासन सुधारणा आयोग,शासन मे नैतिकता,जनेवरि—२००७.

□□□